कोणतीही व्यक्ती आपल्या कर्माने महान बनते, जन्माने नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ३ फेब्रुवारी २०२५ | अंक५६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ९१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


## आम्ही कधी जातीवाद केला नाही-देशमुख

यावेळी देशमुख कुटुंबाने कधीच जातीवाद केला नाही, असे धनंजय देशमुख यांनी सांगितले. देशमुख कुटुंबियांची जमीन मुंडे कुटुंब दोन पिढ्यांपासून कसत आहे, त्याची माहिती त्यांनी महंतांना दिली. प्रामाणिकपणे सांगतो. मनोहर मुंडेंचे चार मुले होते. दोन मुले पुण्यता होते. दोन मुले इथे. त्यांनी जे पिकवलं ते आम्ही खातो. देशमुख कुटुंबाने जातीवाद केला असता तर त्याच्या हत्येनंतर दिसलं असतं. दलित बांधावाला वाचवण्यासाठी गेला. असे धनंजय देशमुख म्हणाले. भगवान गड तुमच्या पाठीशी, ही ग्वाही देतो

# भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री आणि देशमुख कुटुंबिय यांची भेट

## धनंजय देशमुखांनी नामदेव शास्त्रींना आरोपींची कुंडलीच दिली

मंत्री धनंजय मुंडे यांना संतोष देशमुख हत्याप्रकरणात नाहक लक्ष्य करण्यात येत आहे. तर हत्येपूर्वी आरोपींची मानसिकता सुद्धा तपासावी अशा वक्तव्याने भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांच्यावर राज्यातून चोहोबाजूने टीकेची झोड उठली. त्यानंतर बाबांना आपली बाजू समजावून सांगण्यासाठी आज देशमुख कुटुंबिय गडावर पोहचले. त्यांनी महंतांची भेट घेतली. त्यांनी संतोष देशमुख यांच्या खूनामागील खरं कारण, आरोपींचा पूर्व इतिहास, त्यांची गुंडगिरी, खंडणीचे प्रकार, त्यांच्यावरील गुन्ह्यांचा कच्चाचिठ्ठाचा म हाराजांपुढे मांडला. आरोपींच्या गुन्ह्याचा पाढा वाचून संतोष देशमुख यांचे काय चुकले असा प्रश्न केला. धनंजय देशमुख यांच्या आर्त हाक नामदेव शास्त्री यांनी ऐकली. त्यांनी लागलीच भगवानगड



हा देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी असल्याचे जाहीर केले.भगवान बाबाला मानणारं कुटुंब आहे. जातीय सलोखा या गावात होतं. यापूर्वी किती वेळा गडावर आले हे त्यांनी दाखवलं. भगवान गड तुमच्या पाठी कायम राहील ही ग्वाही देतो, असे वक्तव्य नामदेव महाराजांनी केले. भगवान गडाला मानणारं कुटुंब आहे. यापूर्वीते गडावर येत होते. आरोपींची पार्श्वभूमी असलेले पुरावे त्यांनी दिले आहेत. धनंजय यांचं म्हणणं आहे की, याला जातीयवादाचं स्वरुप देऊ नका,. भगवान गड कायम स्वरुपी देशमुख कुटुंबाच्या पाठी उभं राहील. आरोपींची खरी पार्श्वभूमी काय आहे, त्यांच्यावर गुन्हे किती आहे, ते त्यांनी दाखवलं.संतोष अण्णाने किती काम केलं हे त्यांनी दाखवलं. ते मूळचे बाबाचे आहेत. हे आज कळालं. त्यांची जमीन तीन पिढ्यांपासून वंजारी कुटुंब करत आहे. जातीयवाद न करता खऱ्या आरोपीला शिक्षा व्हावी हे गादीवरून सांगणं आहे. आम्ही बसून बोलू. त्यांना दोन घास खाऊ घालू. त्यांना प्रसाद देऊ. संतोष देशमुख यांच्या आत्म्याला शांती मिळेल, असे महंत म्हणाले. आमची कोणतीही गुन्हेगारी नाही. १५ वर्ष सरपंच राहिलेल्या माणसाशी या लोकांनी संपर्क साधायला हवा होता. आरोपींवर आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आरोपींची मानसिकता तपासण्याची गरज आहे. ज्याला आरोपींची बाजू घ्यायची त्यालाच जातीयवादाचा अंश येत आहे. आम्ही सर्व दाखवलं आहे. यांच्या कार्यालयात बसायचे. त्यांच्या गाडीत फिरायचे, असे देशमुख म्हणाले.हा न्यायाचा लढा आहेहा न्यायाचा लढा आहे. अतिशय क्रूर हत्या झाली आहे. प्रत्येक क्षेत्रातील लोक आपल्यासोबत आहे. राजकीय नेते, संप्रदायाचे लोक आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत, ते आमच्यासोबत आहेत. न्यायाच्या भूमिकेत आहेत. अशावेळी लोकप्रतिनिधींना जातीयवादी म्हणू नका. नाही तर ते कोणत्याच न्यायाच्या भूमिकेत येणार नाही. न्याय मागणाऱ्या लोकप्रतिनिधींना चुकीचं ठरवू नका, अशी विनंती धनंजय देशमुख यांनी केली.

## नारायण सिरसाट यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील जेष्ठ नागरिक नारायण बुद्धाजी पाटील सिरसाट वय ६८ वर्षे यांचे दि.२-फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.३-फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

नारायण सिरसाट त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा दोन मुली नातू असा परिवार आहे, ते बालाजी नारायण सिरसाट यांचे वडील होत.

## डॉ. महेश गोलेकर गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित.

### सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल केला कार्यगौरव.

बीड (प्रतिनिधी)

आष्टी मतदार संघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आपल्या आई-वडिलांच्या नावाने सुरू केलेला गंगाई- बाबाजी महोत्सव गेले १९ वर्षांपासून सामाजिक व शैक्षणिक कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या मार्फत राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा सामाजिक व शैक्षणिक कार्यात आपले अमूल्य असे योगदान असणारे डॉ. महेश गोलेकर यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या पुरस्कार वितरणासाठी सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांना आमंत्रित करण्यात आले होते.



डॉ. गोलेकर यांना मिळालेल्या विविध पुरस्कारामुळे जसे की, महाराष्ट्र शासनाचा दलित मित्र पुरस्कार, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सन्मान, केंद्र शासनाच्या केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा विभागाद्वारे राष्ट्रीय एकात्मता कार्य पारितोषिक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राध्यापक, तसेच रोटरी क्लब तर्फे सेवा गौरव आदी पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

डॉ. गोलेकर यांनी खर्डासारख्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची शिक्षणगंगा प्रवाहित केली आहे. कोरोना सारख्या भीषण काळात रक्तदान शिबिरे, सर्व रोग निदान शिबिर, कोरोना काळात मृत्यू पावलेल्या पालकांच्या मुलांना महाविद्यालयात सर्वशुल्क माफ आदी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविलेले आहेत.

साहित्य क्षेत्रात त्यांनी पांढरं सोनं मराठी कथासंग्रह प्रकाशित केलेला आहे, त्यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व योगदानाबद्दल मिळालेल्या पुरस्कारामुळे खर्डा परिसर तसेच छत्रपती शिक्षण संकुलात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## मा.आ.भिमराव धोंडे व अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या हस्ते हमीदखान पठाण सन्मानित



पाटोदा (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे यांचे माता-पिता स्मृतिप्रीत्यर्थ आष्टी येथील भगवान महाविद्यालय मैदानावर राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सामाजिक, शिक्षण, कला, विधी, व तसेच विविध क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त, मान्यवरांना राज्यस्तरीयगंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी मा.आमदार भिमराव धोंडे सिने अभिनेत्री कल्याणी नंदकिशोरजी चौधरी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते हमीदखान पठाण यांना गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी युवा नेते डॉ. अजय दादा धोंडे, राजेंद्र धोंडे काका, युवा नेते अभयराजे धोंडे, माजी जि.प. सदस्य रामराम खेडकर, माजी जि.प. सदस्य रामदास बडे, पाटोदा कृ.उ.बा. समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, श्री. आण्णासाहेब रोकडे, माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड, ह.भ.प.तांदळे महाराज, सरपंच दादा जगताप, अशोक साळवे, ॲड. रत्नदीप निकाळजे, ॲड. खेडकर, सदाशीव मामातुपे, पत्रकार उत्तमराव बोडखे, शहादेव गिते साहेब, दिलीप म्हस्के फौजी, बबनराव औटे, सुदाम काका झिझुर्के, इंजि. संतोष गोल्हार, शेख अन्सार भाई, अजिनाथ गवळी, युवराज खटके, संस्थेचे सर्व प्रशासन अधिकारी, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, प्राचार्य डॉ. दत्तात्रेय वाघ सर समवेत सर्व कर्मचारी वृंद, विध्यार्थी पत्रकार बांधव व इतर मान्यवर उपस्थित होते

हमीदखान पठाण यांना गंगाई -बाबाजी पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यानंतर सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे

## गॅलेक्सी इंग्लीश स्कूल सादोळा येथे पालक मेळावा संपन्न

माजलगाव दि.२(प्रतिनिधी )तालुक्यातील गॅलेक्सी इंग्लीश स्कूल सादोळा या ठिकाणी पालक मेळावा संपन्न झाला.आणि तृतीय चाचणी परीक्षेचा निकाल आयोजित करण्यात आला होता त्यावेळी सन्माननीय पालक वर्ग उपस्थीत होता. चेअरमन डॉ .विठ्ठलराव एरंडे व .शाळेचे प्राचार्य अँथोनी सर पालक वर्ग यांना सविस्तर माहिती दिली, प्रत्येक विदयार्थी आमचा मुलगा आहे त्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊ व गुणवत्ता पूर्ण विकास करू असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन युवराज राऊत सर यांनी केले व आभार प्रदर्शन सुरज सोळंके सर यांनी केले.तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# ज्यांच्याकडे मानाचा तूरा, त्यांचाच जातीवाद, जरांगे पाटीलांनी डागली तोफ

## भुजबळांवर टीका

छगन भुजबळ यांनी आणखी तरी माझ्या नादाला लागू नये, समजून घ्या, शहाणे व्हा, मला खेटू नका, असे जरांगे म्हणाले. गेल्या वर्षी या दोघांमध्ये मोठा वाद दिसून आला होता. पण विधानसभेनंतर दोघांमधील शीतयुद्ध संपल्याचे दिसत असताना बुलडाण्यातील एका कार्यक्रमात भुजबळांनी जरांगेंवर टीका केली होती.

मंत्री धनंजय मुंडे यांची पाठराखण करताना भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांना संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याचा पुळका आल्याने ते वादात सापडले आहेत. खंडणीखोर मारेकऱ्यांची कड घेतल्याने त्यांच्यावर चोहोबाजूंनी टीकेची झोड उठली आहे. आध्यात्मिक क्षेत्रात उच्च पदावरील महाराजांच्या वायफळ बडबडीने संतापाची लाट उसळली आहे. त्यातच आता मनोज जरांगे पाटील यांनी सुद्धा महाराजांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संतोष देशमुख यांचे कुटुंब गडावर पोहचत असतानाच त्यांनी महंतावर तोफ डागली आहे.आरोपींना आनंद वाटला



असेलनामदेव शास्त्री आरोपींच्या समर्थन करत आहे, संतोष देशमुख यांचा हत्या केली म्हणून आरोपींना आनंद वाटला असेल, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केली. धनंजय देशमुख आणि शास्त्री यांच्या भेटीवर त्यांनी प्रतिक्रिया दिली. तो त्यांचा वैयक्तिक विषय आहे कुटुंबाने जावो, महाराजांना जे बोलायचं होतं ते बोलून गेले जातिवादाचा नवीन अंक देऊन गेले, अशी सडकून टीका त्यांनी महंतावर केली. राज्यात जातीवादाच नवीन अंकज्यांच्याकडे मानाचा तूरा आहे, तिथेही जातीवाद होऊ शकतो हा नवीन अंक राज्याला पाहायला मिळत आहे, अशी खरमरीत टीका मनोज जरांगे पाटील यांनी नामदेश शास्त्री यांच्यावर केली आहे. तुम्हाला आरोपींना मारलेली चापट दिसली. पण संतोष देशमुख यांचे रक्त दोन अडीच महिने कोणाला दिसले नाही, अशी टीका त्यांनी केली.

## शास्त्री, तुमची चूक झाली

आम्ही तुमचा सन्मान करतो, पण आपण आपलं बघावं. दुर्सयाकडे डोकवून पाहू नका, स्वतःची चूक झाकण्यासाठी डिवचू नका, तुमच्याकडून चूक झाली आहे, एका समाजाला एका बाजूला नेण्याचं काम झालं आहे, असे जरांगे पाटील यांनी शास्त्रींना सुनावले. जातीय सलोखा बिघडला, पण धनंजय मुंडेच्या टोळीमुळे चौथा अंक पाहायला मिळाला, आरोपींच्या बाजूने मोर्चे निघाले, जातिवादाचा अंक भयंकर आहे, जातिवादाचा चौथा नवीन अंक राज्याला पाहायला मिळाला, अशी टीका जरांगे यांनी केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ३ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


# संपादकीय

## यशाची पुढे आशा दिसे

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज सलग आठवा अर्थसंकल्प मांडत असताना त्यांनी शुक्रवारी संसदेला सादर केलेला आर्थिक पाहणी अहवाल बऱ्याच आशा निर्माण करणारा आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज सलग आठवा अर्थसंकल्प मांडत असताना त्यांनी शुक्रवारी संसदेला सादर केलेला आर्थिक पाहणी अहवाल बऱ्याच आशा निर्माण करणारा आहे. अर्थव्यवस्थेचा आकार जसजसा वाढत जातो; तसतसा दर वर्षी वाढीचा वेग कायम ठेवणे हे कठीण होत जाते. चीननेही हा अनुभव घेतला आहे या पार्श्वभूमीवर अर्थमंत्र्यांनी व्यक्त केलेला ६.३ ते ६.८ टक्के वाढीचा दर हा फारसा कमी मानता येणार नाही. विशेषतः जगात अनेक देश आजही उणे विकासदराशी झुंजत आहेत. बरेचसे एक ते तीन टक्क्यांमध्ये अडकले आहेत. अशा वेळी दर वर्षी सहा टक्क्यांच्या वर विकास वाढीचा दर राखणारा भारत हा जगातला एकमेव मोठा देश आहे. याचा अर्थ, देशासमोरची आर्थिक आव्हाने संपली किंवा आटोक्यात आली, असे नाही. बेरोजगारीचे प्रचंड प्रमाण, वाढती आर्थिक विषमता, पायाभूत सुविधांचे वाढते; पण आजही अनेक ठिकाणी अपुरे असणारे जाळे आणि देशाच्या काही पुंजक्यांमधली भयंकर गरिबी... हे प्रश्न आजही पुरते सुटलेले नाहीत. मात्र, व्यापक अर्थाने भारतीय अर्थकारणाची वाटचाल दमदार होते आहे आणि या वाटचालीचे प्रतिबिंब अहवालात पडलेले दिसते. सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे दर आठवड्याला साठ तासांच्या वर काम करणे आरोग्यासाठी चांगले नाही, असे अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे. गेले काही दिवस या मुद्द्याची अत्यंत अशास्त्रीय व अमानवी चर्चा चालली होती. त्याचबरोबर, कृत्रिम प्रज्ञेचा अधिकाधिक वापर समाजहितासाठी करायला हवा, अशी भूमिका अहवालात मांडली आहे. त्यासाठी नवी नियमावली असावी, असेही म्हटले आहे. दूरसंचार क्रांतीचा पुढचा टप्पा गाठल्याने आता ७८३ जिल्ह्यांपैकी ७७९ जिल्ह्यांमध्ये आता ५-जी सेवा मिळते आहे. प्रशासनालाही याची मदत होत असली तरी नागरिकांना मिळणाऱ्या प्रत्यक्ष सेवांमध्ये या क्रांतीचा अनुभव अधिक यायला हवा. त्या दृष्टीने अर्थमंत्री काही पावले टाकतात का, हे आज समजेल. भारतीय अर्थव्यवस्था वेगाने विस्तारत असली तरी उत्पादन क्षेत्रातील वाढ म्हणावी तितकी प्रभावी नव्हती. जगातील एकूण उत्पादनातील भारताची टक्केवारी २.८ पर्यंत गेली आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, ज्या चीनशी स्पर्धा करण्याची उमेद बाळगली जाते, तिथे आजही जगातील तीस टक्के उत्पादन होते. ही तफावत प्रचंड आहे. घरबांधणी, वाहन उद्योग, सरकारी पुढाकाराने होणारी पायाभूत सुविधांची कामे ही उत्पादन क्षेत्राची खरी बलस्थाने असतात. पोलाद, सिमेंट, वीज या सगळ्यांचे उत्पादन यांच्याशी निगडित आहे. या पार्श्वभूमीवर पीएम आवास योजनेत एक कोटी १८ लाख घरांच्या बांधणीला मान्यता असेल तर ती मोठीच उडी आहे. यातल्या ८९ लाख घरांचे बांधकाम पुरेही झाले आहे. देशातील सर्व शहरांमध्ये झोपडपट्टी निर्मूलन योजनांशी पीएम आवास योजना भक्कमपणे जोडल्याशिवाय शहरांचा तोंडवळा जसा बदलणार नाही; तसेच, या योजनेला खऱ्या अर्थाने व्यापक यश मिळणार नाही. या योजनेपेक्षाही रस्ते आणि रेल्वेमार्ग यांच्या बांधणीचा वेग अधिक समाधानकारक आहे. रेल्वेचे डबे व इंजिन यांच्या उत्पादनाचा वाढीव वेग अधिक चांगली सेवा देण्यास उपयुक्त ठरेल. रेल्वे अर्थसंकल्प मुख्य अर्थसंकल्पात विलीन झाल्याने रेल्वे खात्याचा लाभ झाल्याचे अनेक तज्ज्ञ सांगतात. हा लाभ प्रत्यक्ष प्रवाशांच्या पदरात नेमका कसा पडणार आहे, हे आज अर्थसंकल्पामधूनच समजेल. भारतातला बेरोजगारीचा दर सन २०१७-१८ मध्ये सहा टक्के होता. तो ३.२ टक्क्यांपर्यंत आल्याचे या अहवालात अर्थमंत्र्यांनी नमूद केले आहे. हे आव्हान जर ताकदीने पेलायचे असेल तर आता दर वर्षी किमान ७८ लाख नवे रोजगार निर्माण करावे लागतील. हे आव्हान दिसते तितके सोपे नाही. परकीय किंवा स्वदेशी गुंतवणूक आणि नवे रोजगार यांचे गुणोत्तर पाहिले तरी या आव्हानाची तीव्रता लक्षात येईल.

# वृत्तपत्राची महत्ता व वर्तमान स्थिती

कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते अन्यथा चळवळीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते... डॉ बाबासाहेब आंबेडकर वर्तमान पत्राचे महत्व विशद करण्यासाठी बाबासाहेबांचे हे कथन अतिशय मोलाचे व पर्याप्त आहे. अस्पृश्य, दलित, शोषित जनतेची व्यथा व आवाज सरकार पर्यंत पोहचविण्यासाठी व अन्यायावर प्रकाश टाकण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१.०१.१९२० रोजी मुकनायक नावाचे वृत्तपत्र पाक्षिक मराठी भाषेत प्रारंभ केले आज या ऐतिहासिक घटनेला १०५ वर्ष पूर्ण होत आहेत. वृत्तपत्र काढण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी २५००/-रुपये ची आर्थिक मदत केली.दलित, शोषित समाजाचे प्रबोधन करण्यासाठी,जागृती निर्माण करण्यासाठी मुकनायक नंतर अनेक वृत्त पत्र जसे, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुद्ध भारत इत्यादी प्रकाशित केलेत. या वृत्तपत्राच्या संपादकाचा भार बाबासाहेबां सोबतच श्री पांडुरंग भटकर,श्री गणेश सहस्त्रबुद्धे, श्री.बी. सी.कांबळे, श्री.भैयासाहेब आंबेडकर, श्री.दादासाहेब रुपवते, श्री शंकरराव खरात श्री भारत कद्रेकर,श्री देवराव नाइक यांनी सांभाळला. बाबासाहेबांच्या महापरीनिर्वाणा नंतर प्रबुद्ध भारत हे पाक्षिक बंद पडले. २०१७ मधे बाबासाहेबांचे नातू श्री प्रकाश आंबेडकर यांनी प्रबुद्ध भारत नवीन स्वरूपात आरंभ केले. बाबासाहेबांची कर्मभूमी महाराष्ट्र असल्यामुळे सर्व वृत्तपत्र हे मराठी या सामान्य भाषेत होते.महात्मा गाँधी यांनी प्रकाशित केलेले वृत्तपत्र यंग इंडिया,हरिजन हे इंग्रजी भाषेत होते त्यामुळे यांना जनतेचे वृत्तपत्र म्हणने चुकीचे होईल. वृत्तपत्र हे आंबेडकरी चळवळीचे मोलाचे शस्त्र होते आणि आहे. बदलत्या काळात मास मीडियाचे अनेक साधन उपलब्ध आहेत तरीही पण वृत्तपत्राचे महत्व कायम आहे. बाबासाहेबांच्या चळवळीला धार देण्यासाठी व समाज क्रांती,जाग्रूती निर्माण करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्रानी विशेष करून बाबासाहेबांनी शुरू केलेल्या वृत्तपत्रानी खूप महत्वाची अग्रणी भूमिका बजावली आहे. आंबेडकरी चळवळ आणि सामाजिक बांधिलकीचे वृत्तपत्र हे एकमेकास पूरक आहेत. आंबेडकरी चळवळीचे मुख्य उद्देश :१) समता, स्वातंत्र, बंधुत्व, धर्म निर्पेक्षता, लोकशाही मार्गावर राष्ट्र निर्मिती.२) सामाजिक उत्पीड़न, शोषण, अस्पृश्यता पासून मुक्ति. ३) शिक्षणाचा प्रचार, प्रसार.विशेष करून दलित, शोषित,वंचित समाजाच्या आर्थिक, सामाजिक, विकासासाठी शैक्षणिक विकासाला प्राथमिकता ४) दलित, शोषित समाजाला शासनकर्ती जमात बनविने. दलित, शोषित वर्गास राजकीय सत्तेमधे पर्याप्त प्रतिनिधित्व मिळवून देने. स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण करणे. वर्तमान काळात सामाजिक बांधिलकीचे अनेक वृत्तपत्र आले आहेत.महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात असे वृत्तपत्र मुद्रित व प्रसारित होत आहेत.आधीच्या पाक्षिक, साप्ताहिक वृत्तपत्राची जागा दैनिक वर्तमान पत्रानी घेतली आहे. सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्राचे मूल्यांकन वरील ४ कसोटी वर करावे लागेल. सामाजिक प्रबोधन,शैक्षणिक विकास, सामाजिक अन्याय, अत्याचार विरुद्ध आवाज बुलंद करने किंवा आंदोलन उभे करणे यात सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्राचे महत्वपूर्ण योगदान राहले आहे.परंतु स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण करण्यात यश आले नाही. सामाजिक बांधिलकीच्या वृत्तपत्राकडून स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण करण्यात सक्रिय सहयोग कराण्याची अपेक्षा आहे. राजकीय सत्ता ही दलित, वंचित समाजाच्या विकास,उत्थानाची गुरुकिल्ली आहे. भाजपा आणी काँग्रेस एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.भाजपाला शत्रू लेखायाचे आणी काँग्रेस विषयी मवाळ भूमिका घेणे किंवा दगड आणी विट खेळ मांडने मूर्खपनाचे व विश्वासघातक आहे.भाजपाची भीति,दहशत निर्माण करून व आपल्याच नेत्यावर खालच्या पातळीवर टीका टिप्पणी करून काँग्रेसआघाडीला वोटिंग करण्याचे आव्हान करणारे लेख निवडणुक काळात प्रकाशित करने सामाजिक बांधिलकी गृहीत धरावे काय याचा विचार वृत्तपत्रानी, भाग धारकांनी व हितचिंतकांनी करावा कारण वृत्तपत्राचे मूल्यांकन हे निवडणूकीच्या तापलेल्या निर्णायक दिवसातच होत असते, खायचे आणी दाखवायाचे तेव्हाच दिसून येतात. राजकीय हित गहाण ठेऊन सरसकट बिनशर्त काँग्रेसचे समर्थन केले तर स्वतंत्र राजकीय शक्ति निर्माण होईल काय? काँग्रेस आघाडी कधीच युती करून आंबेडकरी पक्षाना पर्याप्त जागा किंवा प्रतिनिधित्व देत नाही,फक्त हरिजन गैंग ला हाताशी घेऊन किंवा त्यांच्या समोर तुकडे फेकून पर्याप्त जागा ऑफर केल्याचा भास निर्माण करते व भाजपाची भीती दाखवून आंबेडकरी वोटिंग हाईजैक करण्याचा प्रयत्न करते.राजकीय शक्ती निर्माण करण्यासाठी निवडणूकीत सहभाग अत्यंत आवश्यक आहे. काँग्रेस आघाडी ने टाकाऊ म्हणून सोडलेल्या लोकसभेच्या १-२ व विधान सभेच्या ५-७ जागेवरच निवडणुक लढविली तर राजकीय शक्ति निर्माण होईल काय? महाराष्ट्रात आंबेडकरी विचाराच्या नावावर निदान ५० तरी पक्ष आहेत परंतु वंचित बहुजन आघाडी व बसपा सोडले तर बाकीच्यांचे अस्तित्व हे कागदावर आणी लेटर पेड़ वर आहे. गुण-दोष सर्वातच आहेत म्हणून जे उपलब्ध आहे त्यामधुनच निवडायाचे असते.श्री प्रकाश आंबेडकर, आठवले, कवाडे इत्यादी नेत्यांचे सामाजिक आंदोलन व चळवळीत योगदान राहले आहे,आज त्यांचे निर्णय चुकले असतील तरी त्यांच्या विरुद्ध पातळी सोडून लिखाण प्रकाशित करने ते ही काँग्रेस आघाडीच्या निकृष्ट नेत्यांच्या प्रचारासाठी उचित मानता येणार नाही. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत काँग्रेस आघाडीला वंचित ची भीति होती त्यामुळे त्यांनी हरिजन गैंग ला पुढे करून श्री.प्रकाश आंबेडकर यांना लक्ष केले. नामांतर आंदोलन,रिडल्स प्रकरण,मंडल कमीशन आंदोलनात श्री.प्रकाश आंबेडकर यांचे बहुमूल्य योगदान राहले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बौद्धांना केन्द्रीय स्तरावर अनुसूचित जाती च्या सवलती मिळवून देण्यात श्री.प्रकाश आंबेडकर यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. बौद्धांना केन्द्रीय स्तरावर अनुसूचित जातीच्या सवलती व आरक्षण काँग्रेस ने ४० वर्षापर्यंत नाकारले परंतु हे आरक्षण श्री व्ही.पी.सिंग प्रधानमंत्री कार्यकाळात लागू झाले. हे सर्वांना माहीत आहे की श्री.प्रकाश आंबेडकर,श्री.रामविलास पासवान त्या काळात श्री.व्ही.पी.सिंग यांचे अत्यंत जवळचे विश्वासू सहकारी होते.बौद्धांना आरक्षण सवलती लागू झाल्यामुळे संपूर्ण देशभर अनुसूचित जातीचे लोक बौद्ध धर्मीय म्हणून नोंदणी करण्यास स्वतंत्र झालेत याची परिणीति बौद्धांच्या संख्येत लक्षणीय वाढ होण्यास होत आहे व जगाचे ध्यान केंद्रित होत आहे

# पाटोद्यात मोठ्या उत्साहात पार पडली मंथन प्रज्ञाशोध परीक्षा

## --- तालुक्यातील २६८ विद्यार्थ्यांचा सहभाग---

### विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होते; चांगला प्रतिसाद

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी,त्याची तयारी व्हावी यासारख्या उदात्य हेतू घेणारे पहिले पाऊल म्हणून मंथन ही परीक्षा घेण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी यासाठी ही परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये राज्यस्तरीय जिल्हास्तरीय अशी बक्षिसे देण्यात येणार असून सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहिती व्हावे याच उद्देशाने या परीक्षेचे आयोजन आपण करत आहोत. पाटोदा तालुक्यात विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

-प्रा.सोमीनाथ खंडागळे,
परीक्षा समन्वयक पाटोदा



पाटोदा । प्रतिनिधी

सध्याच्या स्पर्धेच्या युगात बालवयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. या उद्देशातून त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी,या हेतूने पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस चे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे यांच्या समन्वयातून रविवारी रोजी मंथन अकॅडमी अहिल्यानगर संचलित मंथन प्रज्ञाशोध ही परीक्षा पार पडली. पाटोदा शहरातील केंद्रावर तब्बल २६८ विद्यार्थ्यांनी या परीक्षेतून आपले टॅलेंट आजमावले आहे. सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती असणे गरजेचे आहे. या हेतूने मागील ५ वर्षांपासून मंथन प्रज्ञाशोध ही बालवयासाठी जनरल नॉलेज तसेच इतर उपयुक्त विषयांवर आधारित स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. पहिली ते आठवीचे विद्यार्थी या परीक्षेमध्ये सहभागी होतात.या परीक्षांमध्ये भाषा गणित,बुद्धिमत्ता,इंग्रजी अशा विषयांमध्ये परीक्षा होते. पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना भाषा, गणित,इंग्रजी आणि परिसर अभ्यास असा एकच पेपर तर तिसरी ते आठवी च्या विद्यार्थ्यांना भाषा गणित,बुद्धिमत्ता, इंग्रजी,विज्ञान भूगोल या विषयांवर आधारित ७५ प्रश्न संख्या असलेले दोन पेपर असतात.पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांना १५० गुणांची तर तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ३०० गुणांची ही परीक्षा प्रत्येक वर्षी घेण्यात येत आहे. पाटोदा तालुक्यात या परीक्षेला विद्यार्थ्यांकडून आता चांगला प्रतिसाद मिळत असून यंदा तब्बल २६८ विद्यार्थ्यांनी पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज / महिला महाविद्यालयात ही परीक्षा दिली.या परीक्षेसाठी संत बाळूदेव महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक वृदांचे तसेच तालुकाभरातून आलेल्या शिक्षकांचे अनमोल सहकार्य मिळाले.

# माणसातला देव माणूस.. म्हणजे सुरेश आण्णा धस

तो काळ अजूनही आठवला तरी अंगावरती शहारे येतात.... तो काळ साधारण २००५ /२००६ चा होता. अण्णा नुकतेच भाजप सोडून राष्ट्रवादीत आले होते. अण्णांची जवळची बरेच कार्यकर्ते, अण्णांना सोडून गेली होती. मी इयत्ता दहावी मधून, अकरावी मध्ये गेलो होतो. साधारण सप्टेंबर चा महिना चालू होता. तारीख १४ सप्टेंबर २००५ वार बुधवार होता. अचानक माझ्या वडिलांच्या छातीमध्ये चमक निघण्यास सुरुवात झाली..... तसे माझे वडील खुप भित्र्या आणि हावळ्या मनाचे होते. तसं पाहिलं तर त्यावेळेस आमच्या गावामध्ये, स्थानिक डॉक्टर नव्हता. त्यामुळे माझे वडील करंजी घाट येथील, डॉक्टर पालवे यांच्याकडे गेले. डॉक्टर पालवे यांनी वडिलांची पूर्ण तपासणी केली. व तपासणी अंती अहिल्यानगर च्या डॉक्टर सानप यांची चिठ्ठी दिली. व तात्काळ अहिल्यानगर ला जाण्याचा सल्ला दिला. दुसऱ्या दिवशी माझे वडील, व माझे आजोबा, अहिल्यानगरच्या हृदयरोग तज्ञ डॉक्टर सानप यांच्याकडे गेले. डॉक्टरांनी हृदयाची पूर्ण तपासणी करून, तपासणी अंती वडिलांना सांगितले की, तुमचे दोन्हीही वाल निकामी झाले आहेत..... त्यामुळे तुम्हाला तात्काळ ऑपरेशन करावे लागेल. आणि ऑपरेशनला साधारण ४ ते ५ लाख रुपये एवढा खर्च येईल.... डॉक्टरांचे हे बोलले वडिलांच्या कानावर पडताच, वडिलांच्या पायाखालची जणू मातीत सरकली.... वडिलांना काय करावे, आणि कसे करावे ही सुचतच नव्हते. कारण ऑपरेशन साठी ४ ते ५ लाख रुपये एवढा खर्च येणार असल्यामुळे, एवढा पैसा कुठून उपलब्ध करायचा, हा एक यक्ष प्रश्न वडीला पुढे उभा होता.... वडील काहीतरी विचार करत होते.... तेवढ्यात डॉक्टरांनी पुढचा प्रश्न केला... तुम्हाला आजची आज ॲडमिट व्हावे लागेल. आणि तुम्ही आज ॲडमिट झाले नाही तर, तुमच्या आयुष्यातील फक्त दोनच दिवस, शिल्लक राहिले आहेत म्हणून समजा. डॉक्टरांनी आपल्या उजव्या हाताचे दोन बोट दाखवीत, वडिलांना सूचक इशारा केला.... तसं पहिल्यापासूनच माझ्या आजोबांना ऐकायला कमी यायचं. डॉक्टर आणि वडिलांमध्ये काय संभाषण चालू आहे, हे माझ्या आजोबांना काय समजणार. परंतु डॉक्टरांनी वडिलांना जे उजव्या हाताचे दोन बोटे दाखविले, कदाचित माझ्या आजोबांनी, त्या दोन बोटाचा अर्थ २००० लावला असावा... कारण डॉक्टरांना माझे आजोबा म्हणाले की, आम्ही कुठूनही दोन हजार रुपये आणू, परंतु डॉक्टर तुम्ही माझ्या मुलाला नीट करा, डॉक्टरांनी माझ्या आजोबांच्या बोलण्याकडे साप दुर्लक्ष केले. वडिलांना डॉक्टर म्हणाले की, तुम्ही आत्ताची आत्ता ॲडमिट व्हा, आपल्याकडे वेळ शिल्लक नाही.... परंतु वडीलांकडे पैसे नसल्यामुळे, वडील ॲडमिट राहू शकले नाही. वडील संध्याकाळी घरी आल्यानंतर आम्हाला ही बातमी समजली. ही बातमी समजल्यानंतर, ज्याप्रमाणे आकाशामध्ये वीज चमकावी, त्याप्रमाणे आमच्या काळजामध्ये धस......झालं. कारण पाच लाख रुपये कुठून आणायचे, हा यक्ष प्रश्न आमच्या कुटुंबावर ती पडला होता. कारण त्यावेळेस आमची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे, आम्हाला हे पाच लाख रुपये जमवणे अशक्य होते... त्यावेळेस मला कळाले, सुखात सर्व माणसे येतात , परंतु दुःखात कोणीच उपयोगी पडत नाही. जो दुःखात साथ देतो, तोच आपला असतो..त्यावेळेस आमच्या देऊळगाव घाटचे सरपंच संभाजी मस्के हे होते. त्यांना ही बातमी समजल्यावर ती, त्यांनी आमच्या कुटुंबीयांना एक प्रकारे आधार देण्याचं काम केलं. तुम्ही काही घाबरू नका, सर्व काही ठीक होईल, आपण सुरेश आण्णा कडे जाऊ, हा शब्द आम्हाला त्यांनी दिला. त्यावेळेस प्रथम अण्णा... हा शब्द मी ऐकला होता. आम्ही तिसऱ्याच दिवशी अण्णांकडे गेलो, अण्णांना सर्व हकीगत सरपंचांनी सांगितली. आण्णा निक्षणाचाही विचार न करता, आपल्या पि.ए.ला पाच लाखा रुपयाचे पत्र आमदार फंडातून देण्याचे सांगितले. त्यावेळेस आण्णांचे पी.ए पवार हे होते. अण्णांनी आम्हाला पाच लाख रुपयांचे पत्र तात्काळ दिले. त्यामुळे माझ्या वडिलांचे ऑपरेशन, आनंद ऋषी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे फुकट होऊ शकले. ज्या डॉक्टरांनी माझ्या वडिलांना दोन दिवसाची मुदत दिली होती, तेच माझे वडील पुढे १७ वर्ष जगू शकले, ते फक्त आणि फक्त सुरेश अण्णा मुळेच.... आम्ही हे अण्णांचे उपकार कधीच विसरू शकणार नाहीत. कारण माझ्या वडिलांना जे १७ वर्षाचा बोनस आयुष्य भेटलं, ते फक्त सुरेश आण्णा मुळेच. मित्रांनो मला जर कोणी विचारलं की, तू देव बघितला का ? तर माझं उत्तर एकच असेल की, मी देव बघितला नाही, परंतु माणसातला देव माणूस सुरेश आण्णाच्या रूपाने नक्कीच बघितला..


आदिनाथ ठोंबरे,
देऊळगाव घाट

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ३ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


## शाळेतील शिक्षक बदलीच्या निर्णयाविरोधात शाळा व्यवस्थापनसमिती आक्रमक -



जामखेड येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत शिक्षक समायोजनाच्या निर्णयाविरोधात शाळा व्यवस्थापन समिती आणि गावकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार येथील एका शिक्षिकेला अतिरिक्त ठरवून दुसऱ्या शाळेत पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या शाळेत पहिली ते नववी वर्ग असून, १५४ विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आधीच शिक्षक संख्या अपुरी आहे. सध्या शाळेत चार शिक्षिका कार्यरत आहेत-दोन सहशिक्षिका, एक शिक्षण सेविका आणि एक प्राथमिक पदवीधर शिक्षिका. शाळेच्या गरजेनुसार येथे आणखी तीन शिक्षकांची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत एका शिक्षिकेची बदली झाल्यास विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होईल, असा स्थानिक नागरिकांचा आणि शाळा व्यवस्थापन समितीचा आक्षेप आहे. या संदर्भात शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांसह सदस्य आणि गावकऱ्यांनी एकत्र येऊन शाळेसमोर जोरदार घोषणाबाजी केली. आमच्या शाळेवर अन्याय होऊ देणार नाही, असा ठाम इशारा देत, त्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालय, अंबड, समोर आंदोलन करण्याची तयारी दर्शवली आहे.

## पंतप्रधान घरकुल आवास योजना मंजूर लाभार्थ्यांनी दोन दिवसांत कागदपत्रांची पूर्तता करावी

आष्टी तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. गावनिहाय ग्रामपंचायत कार्यालयासमोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसांत आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा.आणि मार्च अखेरपर्यंत घराचे बांधकाम पूर्ण करावे असे आवाहन आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ.सचिन सानप यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, आ.सुरेश आण्णा धस यांनी प्रयत्नपूर्वक आष्टी तालुक्यामध्ये अनेक गावातील लाभार्थ्यांसाठी पंतप्रधान घरकुल योजनाग्रामीण टप्पा -२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे काम हाती घेतले आहे.. प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी तालुक्यात ६१५७ घरकुले मंजूर झाले असून यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. यासाठी १) ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा, २) आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसात करावी. पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पहिल्या हप्त्याचे अनुदान जमा केले जाणार आहे. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा करावेत म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा पहिला हप्ता जमा होणार असून या घरकुलांचे बांधकाम मार्च २०२५ अखेर पूर्ण करावे,याबाबत माननीय आमदार सुरेश आण्णा धस यांनी याबाबत बैठकीमध्ये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व लाभार्थ्यांनी दोन दिवसात कागदपत्र जमा करून पहिला हप्ता पदरात पडून घ्यावा आणि बांधकाम सुरू करून उर्वरित अनुदान प्राप्त करून घ्यावे आणि ३१ मार्च २०२५ पूर्वी घरकुलाची बांधकाम पूर्ण करण्यात यावे,असे आवाहनही गटविकास अधिकारी डॉ.सचिन सानप यांनी केले आहे.

## अजय चव्हाण यांच्या अभंगसरीताकाव्यसंग्रहाचे प्रकाशन तसेच चंद्रशेखर भुयार यांची गझल मैफील




युवा ज्योती सांस्कृतीक मंच दारव्हा तर्फे २८ जानेवारीला गझलकार चंद्रशेखर भुयार (बादशाह) यांची मराठी गझल मैफल तसेच तालुक्यातील, तरनोळी येथील युवा कवी अजय रमेश चव्हाण यांच्या ङ्गअभंगसरिताङ्ग ह्या अभंग संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याचा कार्यक्रम सुखकर्ता हॉल दारव्हा येथे संपन्न झाला. गझलकार चंद्रशेखर भुयार (बादशाह) यांचे हस्ते ङ्गअभंगसरिताङ्ग पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनूदानातून हा अभंग संग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. प्रारब्धात काय । कशाला बघावे । हसून जगावे । आयुष्याला ।। कशाला करावे । उद्याचे विचार । स्वप्नाला साकार । आज करा ।। प्रारब्धावर अवलंबून न राहता स्व प्रयत्नाने आपली स्वप्ने साकारली पाहिजे असा वास्तववाद सांगणारे अभंग अजय चव्हाण यांनी ह्या संग्रहात मांडले आहेत.

अभंगसरिता प्रकाशनानंतर गझलकार चंद्रशेखरभुयार (बादशाह) यांची गझल मैफल रंगली. बादशहा यांनी सादर केलेल्या बहारदार गझलांना रसीकश्रोत्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत गेला.श्रोत्यांना खिळवून ठेवत शेतक-्यांची व्यथा तसेच सामाजिक,राजाकिय,तरुणाई,व्यसनाधिनता अशा चौफेर विषयावर बहारदार गझलांचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.क.स.राठोड होते. कार्यक्रमाचे संचालन कवी प्रवीण सोनोने व आभार प्रदर्शन सुशिल मेहकरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी राजेश तरटे,अनिल ठाकरे, रामकृष्ण सातव,विनोद कडू , विनोद राठोड,अजय ढबाले,भरत घोंगे,सुशील मलमकार,गजानन गुल्हाणे अनिल वानखडे यांचे सहकार्य लाभले.

# गंगाई - बाबाजी महोत्सव हा राज्यातील अत्यंत दिमाखदार सोहळा : सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी




आष्टी येथील माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या नावाने गेली १९ वर्षे सुरू असलेला गंगाई - बाबाजी महोत्सव आणि गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळा हा राज्यातील अत्यंत आगळावेगळा आणि दिमाखदार सोहळा असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांनी आष्टी येथे शनिवारी (ता १) केले. भगवान महाविद्यालय आष्टी येथे आयोजित गंगाई - बाबाजी महोत्सवानिमित्त दिल्या जाणाऱ्या गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी मतदार संघाचे माजी आमदार शिक्षणमहर्षी भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास पाटोदा पंचायत समितीच्या माजी सभापती सुवर्णा लांबरुड, ह. भ. प. दिनकर महाराज तांदळे, डॉ. अजय दादा धोंडे, अभय धोंडे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, रामराव खेडकर, रामदास बडे, पांडुरंग नागरगोजे, रत्नदीप निकाळजे, बबन आवटे, अन्सार शेख, अशोक साळवे, पत्रकार उत्तम बोडखे, भगवान राऊत, रावसाहेब लोखंडे, बाळासाहेब शेकडे, महारुद्र खेडकर, सदाशिव तुपे, राजेंद्र धोंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# आनंद नगरीत जि.प.सादोळा शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले डिजिटल ट्रांजेक्शन (क्यूआर कोड) चा वापर

माजलगाव-प्रतिनिधी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सादोळा शाळेमध्ये आनंददायी शनिवार निमित्त आनंद नगरी मध्ये खाऊ गल्लीचे आयोजन केले होते त्याला गावातील नागरिकांनी प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शाळेतील विद्यार्थ्यांनी खमंग ढोकळा, हलवा, भेळ, पाणीपुरी, इडली सांबर बोरकुट, पापड, हरभरा उसळ, लिंबू शरबत, पाणी बॉटल ,पौष्टिक कचोरी, वडापाव ,समोसा इत्यादी पदार्थांचे स्टॉल लावले होते हे सर्व पदार्थ पौष्टिक हेल्दी आणि उत्कृष्ट क्वालिटीच्या तेलामधून तळलेले होते त्यामुळे ते आरोग्यास पौष्टिक होते तसेच या समयी सर्व विद्यार्थ्यांना बौद्धिक खेळ, व्यावसायिक प्रशिक्षण मिळाले तसेच विद्यार्थ्यांनी या व्यवहारासाठी डिजिटल ट्रांजेक्शन ,क्यू आर कोडचा वापर केला त्यामुळे एक वेगळाच अनुभव विद्यार्थ्यांना या व्यावसायिक खेळ प्रशिक्षणानिमित्त आला यासाठी सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक श्रीमान आदरणीय नवनाथ शिंनगारे सर सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा स्काऊट प्रमुख श्री पुरुषोत्तम काठुळे सर, राधाकृष्ण मुंडे सर, प्रमोद काळे सर ,तेजस कुमार बनसोडे सर ,गणेश गायकवाड सर, श्रीमती अनिता लांडगे मॅडम ,श्रीमती सविता पिल्लेवाड मॅडम, श्रीमती राजश्री गोरे यी विद्यार्थ्यांना लाभले तसेच आनंददायी शनिवार निमित्त आनंद नगरी मध्ये खाऊ गल्ली कार्यक्रमचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद बापू शिंदे, सुनील नाना खंडागळे, विकास भैया नीलकंठ, अशोक राऊत, डॉक्टर अरुण साळुंके , पवनराव सोळंके, बाळासाहेब सोळंके, शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष रामप्रसादजी सोळंके , सतीश राव सोळंके ,गौतमराव सोळंके , किशोर एरंडे ,अशोकराव सोळंके (अंकल) तसेच गावातील शिक्षण प्रेमी नागरिक माता पालक आणि सर्व बंधू आणि भगिनीं शाळेतील सर्व शिक्षक बंधू भगिनींचे कौतुक केले त्याबद्दल सर्वांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले अशा उत्सवाच्या आनंदाच्या वातावरणात आनंद नगरीला गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे प्रचंड प्रतिसाद मिळाला त्याबद्दल पुन्हा एकदा सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमान पुरुषोत्तम काठुळे सर यांनी सर्व गावकऱ्यांचे आभार मानले धन्यवाद व्यक्त केले.

## सर्व घटकांना न्याय देणारा परिपूर्ण अर्थसंकल्प

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील नवीन भारताचा नवा नकाशा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात देशातील शेतकरी, शेतमजूर, तरूण वर्ग, महिला अशा सर्व समावेशक घटकांचा विचार करण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प सर्व सामान्य घटकांना न्याय देणारा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील नवीन भारताचा नवा नकाशा समोर ठेवणारा आहे अशी शब्दांत राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेची घोषणा करण्यात आली आहे.सरकार ही योजना राज्यांसोबत चालवणार आहे. १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. याचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ लाख रुपयांचे पॅकेज, किसान क्रेडिट कार्डच्या कर्जाची मर्यादा आता ३ लाखांवरून ५ लाख रूपये करण्यात आली आहे. किसान क्रेडिट कार्ड द्वारे ७ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना सुलभ कर्ज सुविधा मिळणार आहे. सर्व जिल्हयामध्ये जिल्हा रूग्णालयात कॅन्सर डे केअर सेंटर, ३६ जीवरक्षक औषधी करमुक्त, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय यासाठी पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज आदींसाठी यात तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पात नव्या करप्रणालीची घोषणा करण्यात आली आहे.त्यानुसार १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त होणार आहे.

## चोरीस गेलेले मोबाईल फोन पोलिसांनी मिळून दिले परत

दोन दिवसांपूर्वी जिजामाता चौक येथे भाजीपाला विकणाऱ्या महिला उर्मिला गणेश काशीद राहणार जिजामाता चौक, बीड यांचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता. तसेच निलेश फुलचंद तिडके राहणार धानोरा रोड बीड. यांचा मोबाईल रिक्षात विसरून राहिला होता परंतु रिक्षावालाने तो लबाडीने चोरून ठेवला होता. या दोन्ही मोबाईलचा तपास बीड शहराच्या डीबी पथकाने वेगाने करून ४८ तासाच्या आत दोन्हीही मोबाईल परत मिळून दिले. दोन्ही मोबाईल महागडे होते आणि ते मोबाईल परत मिळाल्यानंतर यातील पीडित यांनी समाधान व्यक्त केले आहे. सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विश्वंभर गोलडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलिस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद यांनी केली आहे.

# तिरुपती प्रायमरी इंग्लिश स्कूल वडवणी मध्ये माता पालक मेळावा व खेळ पैठणीचा कार्यक्रम

मकर संक्रांतीचे हळदी कुंकूवानिमित्त माता पालक मेळावा व खेळ पैठणीचा होम मिनिस्टरचा कार्यक्रमाचे आयोजन वडवणी येथील,तिरुपती प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये दि.३१ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. सुनिता खांडेकर तर उद्घाटक म्हणून महिला पत्रकार सौ.गितांजली लव्हाळे मॅडम व प्रमुख पाहुण्या सौ.रचनाताई नहार,इंग्लिश स्कूलच्या संस्थेच्या संचालिका सौ. उषाताई मुंडे,इंग्लिश स्कूलचे संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोळंके, संचालक बंडोजी खांडेकर,इंग्लिश स्कूलचे प्राचार्य प्रा.गणेश सोळंके आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. महिला पत्रकार



सौ.गितांजली लव्हाळे मॅडम यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले त्यानंतर महापुरुषांच्या वेशभूषा इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी सादर केल्या त्यामध्ये जिजामाता यांची वेशभूषा कु.स्वरा सोळंके तर झाशीची राणी कु.सानिका आळणे,महात्मा गांधी चि.समर्थ मदने,लोकमान्य टिळक चि.विराज शिंदे,भगतसिंग समर्थ घुमरे,सुभाष चंद्र बोस चि.आकाश चोरमले,महात्मा ज्योतिबा फुले चि.सौरभ गार्डी,सावित्रीबाई फुले चि.स्वरा चोरमले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चि.साई कवचट छत्रपती शिवाजी महाराज चि.ऋतुराज वरकड यांनी केल्या होत्या

# शिवसंग्रामच्या नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुभाष जाधव यांची निवड जाहीर




शिवसंग्राम संघटनेची बीड जिल्हा कार्यकारीणी बैठक शिवसंग्राम भवन बीड येथे शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश उपाध्यक्ष श्री. प्रभाकर अप्पा कोलांगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी संपन्न झाली.येत्या काळात येऊन ठेपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था व बीड नगर पालिका निवडणूक अनुषंगाने तसेच पक्षबांधणी विस्तार अनुषंगाने जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करून आज शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुभाष जाधव सर, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, बीड तालुकाध्यक्ष पंडित माने, बीड तालुका उपाध्यक्षपदी दिनकर शेळके व बीड शहराध्यक्षपदी सुहास पाटील यांच्या निवडी जाहीर केल्या.उर्वरित निवडी यथावकाश जाहीर करण्यात येतील असे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी जिल्ह्यातील उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योतीताई मेटे यांनी सांगितले की,आगामी काळात झोकून काम करण्याची तयारी नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठेवा .प्रत्येकाने जबाबदारी ओळखून जबाबदारीने काम करावे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून १००% कामाची अपेक्षा आहे.नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका समोर ठेवून या निवडी करण्यात आलेले आहेत. शिवसंग्राम अंतर्गत आगामी काळात नवीन आघाडी तयार केल्या जातील. ग्रामीण व शहरी भागात जास्तीत जास्त कार्य करावे. येत्या काळात जास्तीत जास्त पदाधिकारी कार्यकर्त्यांचे जाळे बीड जिल्ह्यात करावयाचे आहे. पक्षाची शिस्त पाळा.पक्षामध्ये एक कुटुंब म्हणून वागा. तरुणांनी बदल करायची हिंमत दाखवली पाहिजे सकारात्मकता, आक्रमकपणा कार्यकर्त्याने अंगी बनवावा. सदैव हिरोच्या भूमिकेत रहा,आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती संपूर्ण जागा स्वहिमतीवर लढायच्या आहेत मराठा आरक्षण, अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांचे स्मारक,शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याकरिता यापुढील वाटचाल करायचे आहे. सोशल मीडियावर सतर्क रहा,शिवसंग्रामचा झेंडा डौलाने फडकवत दिलेल्या जबाबदारीला जागा, संघटनेला व स्वतःला मोठे करा अशा स्पष्ट शब्दांत उपस्थित कार्यकर्त्यांना शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी मार्गदर्शन केले.

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता
दैनिक लोकआरंभ — लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ३ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


## केज मध्ये कर्करोग व स्त्री रोग निदान मोफत तपासणी होणार

### महीलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा : सय्यद माजेद

कै.अप्पासाहेब देशमुख सेवा भावी संस्था व श्रेया हास्पिटल आणी उपजिल्हा रुग्णालय,केज यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुकृपा सेवा भावी संस्था व यशवंत हास्पिटल बीड/उस्मानाबाद कँन्सर प्रकल्प बार्शी यांच्या सहकार्यने मोफत कर्करोग व स्त्री रोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन तरी लोकांनी जस्ती जास्त या शिबिराच लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले. महीला मध्ये वाढत असलेल्या कर्करोग (कँन्सर) व स्त्री रोग याचे प्रमाण वाढत असलेले दिसुन येत आहे यामुळे आमच्या कै.अप्पासाहेब देशमुख सेवा भावी संस्थेने पुढाकाराने घेऊन दि.४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्रेया हास्पिटल अंबाजोगाई रोड केज येथे शिबीराचे आयोजन केले.ज्या महीलांना पोटात गाठ,तसेच स्थन मध्ये गाठ तसेच महीलांच्या इतर समस्या आहे अशा महीलांनी जास्ती जास्त सहभागी होऊन आपली सर्व तपासणी मोफत मध्ये करुण घ्यावी तसेच या शिबिरात सोनोग्राफी आणी रक्त तपासणी केवळ पन्नास टक्के पैसे भरुण केली जाणार आहे.तसेच तपासणी साठी सुप्रसिद्ध अनुभवी तज्ञ डॉ. राघवेंद्र राजेश्वरकर, बार्शी/मुंबई डॉ. राजेभोसले, डॉ. नंदकुमार पानसे,श्रेया हास्पिटलचे स्त्री रोग तज्ञ डॉ.योगेश्वरी थोरात (चव्हाण) डॉ.तेजस थोरात, डॉ. स्नेहा साखरे,डॉ.शितल नेहरकर या तज्ञ डॉक्टर टिमच्या उपस्थितीत हे शिबिर होणार असुन शहरातील व ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत तपासणी करुण घ्यावी असे आव्हान कै. अप्पासाहेब देशमुख बहुद्देशीय सेवा भावी संस्थाचे अध्यक्ष अरुणराव देशमुख सचिव सय्यद माजेद यांनी केले आहे.

# एसपी साहेब तुम्ही बोलावलेले वाळू माफिया नाहीत ते टिप्पर ड्रायव्हर आहेत; तुमच्याच कर्मचाऱ्यातले वाळू माफिया शोधा

### कॉवत यांना अंधारात ठेवत पोलिसांची चालबाजी ; वाळू तस्करीतले फक्त शेंडेच दाखविले फांद्या, खोड तसेच ठेवल

जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी काल शनिवारी वाळू तस्करी मध्ये सामील असलेल्या माफी यांची ओळख परेड घेतली मात्र. वास्तविक ज्यांना पोलिसांनी गोळा करून आणले ते वरवरचे गुन्हेगार असून, खरे वाळू माफिया हे कर्मचाऱ्यांमध्ये दडलेले आहेत. पोलीस अधीक्षक साहेबांनी कर्मचाऱ्यात असलेले वाळू माफिया शोधून काढावेत, असे अपेक्षा जिल्ह्यातील नागरिक करीत असून, वाळूच्या तस्करीमध्ये सर्वाधिक टिप्पर हे महसूल आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे असल्याचे सगळ्या जिल्ह्याला ठाऊक आहे. त्यामुळे अगोदर कर्मचाऱ्यांपासूनच सफाईला सुरुवात व्हावी म्हणजे वाळू तस्करांची पाळेमुळे उघडून टाकण्यात यश येईल असे बोलले जात आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यावर आणि त्यात अडकलेल्या गुन्हेगारावर जरब बसविण्यासाठी मोठी मोहीम उघडली आहे. अवैध वाळू उपसा आणि त्याची अवैध वाहतूक ही जिल्ह्यामध्ये सर्वाधिक होत असून यात अनेक वाळू माफिया सक्रिय आहेत.



वाळू तस्करीची पाळीमुळे उखडून टाकण्यासाठी पोलीस अधीक्षक कॉवत यांनी जोरदार कंबर कसली असल्याचे दिसत आहे. यामुळेच यांनी फर्मान काडीत वाळू तस्करी करणाऱ्या आणि रेकॉर्डवर असणाऱ्या सुमारे ५० लोकांना बोलावून घेतले आणि त्यांची ओळख परेड केली. मात्र ज्या लोकांना बोलावण्यात आले होते ते केवळ झाडाचे शेंडे होते. खरे वाळू माफिया हे मात्र अजूनही पुढे आणले गेलेले नाहीत. वाळू तस्करीच्या या गोरख धंद्यामध्ये महसूल आणि पोलिसातीलच कर्मचारी सर्वाधिक सक्रिय असल्याची माहिती सगळ्यांना आहे. महसूल मधील आणि पोलिसांमधील कर्मचाऱ्यांच स्वतः चे टिप्पर असून त्या मार्फत ते वाळू तस्करी करतात. कॉवत साहेबांनी याबाबत कठोर भूमिका घेतली असल्याने सध्या परिस्थितीला कर्मचाऱ्यांनी आपले वाळूचे टिपर लपवून, झाकून बाजूला ठेवले आहेत. या कर्मचाऱ्यांमुळेच वाळू वाहतुकीला



सर्वाधिक प्रोत्साहन मिळत असून, वाळू तस्करावर कारवाई होताना दिसत नाही. म्हणजे शेतात कुंपण खात असल्याचा हा प्रकार असून तो सर्वांना माहित आहे. यासाठी एसपी साहेबांनी या कर्मचाऱ्यांची पाळीमुळे खोदून काढली तर वाळू तस्करी आपोआपच नियंत्रणात येईल. नवनीत कॉवत हे तसे जिल्ह्याला नवीन आहेत. वाळू माफियांना बोलवा असे सांगितल्यानंतर पोलिसांनी काल साध्या म्हणजे अगदी चालकांना बोलावून घेतले. म्हणजे स्वतः एसपी साहेबांना अंधारात ठेवत पोलिसांनी खरे वाळू माफिया समोर आणलेच नाही. त्यातही जे कर्मचारी या धंद्यामध्ये गुंतले आहेत त्याची माहिती देणे आवश्यक असतानाही ती दिली गेली नसल्याचे जाणवत आहे. जे रेकॉर्डवर आहेत त्याच वाळू तस्करांना बोलाविण्यात आले याचा अर्थ असा आहे की, जे कर्मचारी या गोरख धंद्यामध्ये आहे ते रेकॉर्डवरच नाही. त्यामुळे त्यांना बोलावण्याचा किंवा समज देण्याचा प्रश्न येत नाही. मात्र या धंद्याच्या मुळापर्यंत जायचे असेल तर प्रत्येक गुन्हेगार शोधून काढला पाहिजे

# सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर येथे हळदीकुंकू कार्यक्रम व माता पालक मेळावा

सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर ता.जि.बीड येथे महिलांचा जिव्हाळ्याचा आवडता सण मकरसंक्रांती निमित्त हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.लक्ष्मी ढेंगे तर प्रमुख पाहुणे म्हणून अंगणवाडी च्या सिरसट मॅडम, ग्रा.स.सौ.कांताबाई वाघे, सौ.अर्चना खांडे उपस्थित होत्या. सर्वप्रथम प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.शाळेतील लहान मुलींनी स्वागतगीत गाऊन सर्व मान्यवर व उपस्थित महिलांच स्वागत करण्यात आले... हळदी कुंकु म्हटल की महिला पारंपारिक पध्दतीने एकमेकांना वाण देऊन मकरसंक्रांत साजरी करतात पण या पारंपारिक गोष्टीला फाटा देत सदर कार्यक्रमांतर्गत सामाजिक संदेशाची देवाणघेवाण वाणाच्या रुपात



करण्यात आली. कार्यक्रम ग्रामीण भागातील असल्यामुळे महिलांच्या सर्वात आवडीचे लांबलचक उखाणे ऐकून सर्व महिलांमध्ये असलेला उत्साह दिसुन आला. या मध्ये शेकडो महिलांनी आपल्या पतीराजाचा उखाणे घेऊन गौरव केला.. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्या मध्ये लिंबु-चमचा, संगीतखुर्ची हे खेळ घेण्यात आले... लिंबुचमचा मध्ये प्रथम क्रमांक- घुगे शारदा जितेंद्र द्वितीय क्रमांक- गणगे सारिका मच्छिंद्र तृतीय क्रमांक- थोटे गंगासागर अशोक संगीतखुर्ची मध्ये प्रथम क्रमांक- पवार लक्ष्मी सतीश द्वितीय क्रमांक- सातपुते सोनाली अक्षय तृतीय क्रमांक- खांडे ज्योती हनुमान यांनी क्रमांक पटकावले. सर्व विजेत्या स्पर्धकांना शाळेच्या वतीने आकर्षक बक्षिसे देण्यात आली व त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.शितल सातपुते यांनी केले तर सौ.ज्योती नरवडे मॅडम, सौ. किर्ती सातपुते मॅडम, सौ.मंजुश्री पौळ मॅडम, किरण मॅडम, सौ.शिवाणी नरवडे मॅडम, सौ. कोमल बुरांडे मॅडम, सौ.काचमांडे मॅडम, सौ. अयोध्याआनेराव मावशी यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

## शिवराज मित्र मंडळ परिवारा तर्फे येळंब (घाट) च्या भूमीपुत्रांचा सत्कार समारंभ




बीड तालुक्यातील येळंब घाट मध्ये शनिवार दिनांक ०१/०२/२०२५ रोजी शिवराज सिद्धिविनायक गणेश मंदिर येथे दरवर्षी प्रमाणे गणेश जन्म मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. त्या निमित्ताने येळंब घाट गावचे श्री.विकास स्वामी सर यांची कन्या कु.शिरीशा स्वामी ही नुकतीच चझडउ मार्फत कार्यकारी अभियंता म्हणून परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.व कु.मानसी सुपेकर ही येळंब घाट मधील बळवंतराव कदम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय शाळेतून इयत्ता १० वी ला १०० टक्के गुण घेणारी पहिली कन्या ,व डॉ.अन्वर अफसर सय्यद हा नुकताच अंबाजोगाई येथून चइइड म्हणून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यामुळे व श्री. दत्तात्रेय कदम सर नुकताच मैत्रा फाउंडेशन बीड चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला,व पत्रकार अशोक काळकुटे यांना जिल्हा स्तरीय भ्रष्टाचार विरोधी पुरस्कार मिळाला याबद्दल या सर्व येळंब(घाट) च्या भूमीपुत्रांचा सत्कार शिवराज मित्र मंडळ व येळंब घाट गावातील नागरिकांनी केले

# जय हिंद कॅम्पस बीड च्या शालेय फन फेअर कार्यक्रमाचे जल्लोषपूर्ण वातावरणात उद्घाटन संपन्न

बीड शहरातील नामवंत जयहिंद कॅम्पसच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यातीलच भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांना व्यवसायाची आवड निर्माण व्हावी यासाठी शिका व कमवा ही संकल्पना लक्षात घेऊन फन फेअर या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी जय हिंद कॅम्पस मिल्लत नगर बीड येथे करण्यात आले होते सदरील फन फेअरचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा सरचिटणीस मा. सर्जेराव तात्या तांदळे साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश महामंत्री मा. सलीम जहांगीर साहेब, मराठा आरक्षण मोर्चा समन्वयक गोपाल जी धांडे साहेब, मदरसा इमाम रब्बानी चे संचालक मुफ्ती अन्वर साहेब, सलाम एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटीचे सफी अनवरी सर, समाजसेवक खय्युम इनामदार, आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी सर्जेराव जी तांदळे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण घेण्याचे प्रतिपादन केले व चांगले गुण आत्मसात करण्यासंबंधी मार्गदर्शन केले यावेळी सलीम जहांगीर साहेब यांनी जय हिंद कॅम्पसची होत असलेली उत्तरोत्तर प्रगती संदर्भात कौतुक केले व विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षणाची संधी कॅम्पसच्या निमित्ताने या भागांमध्ये उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे सचिव शेख निजाम यांचे अभिनंदन केले आलेल्या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने बनवून आणलेल्या विविध स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला

# सुरीला मध लावून मध्यमवर्गीयांच्या मानेवर फिरवण्याचा प्रकार - सामनातून अर्थसंकल्पावर टीकास्त्र

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शनिवारी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये त्यांनी १२ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणा-यांना कर द्यावा लागणार नाही अशीशिवसेघोषणा केली. त्यावर विविध स्तरांतून प्रतिक्रिया येत आहेत. काहींनी ही घोषणा आवडली आहे, विरोधकांनी मात्र अर्थसंकल्पावर टीका केली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या ङ्गसामनाफ्मधूनही या अर्थसंकल्पावर टीकेची झोड उठवण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचाही खडूस असा उल्लेख अग्रलेखात करण्यात आला आहे. ङ्ग काळा पैसा आणि बनावट नोटांचा देशात सुळसुळाट सुरू आहे. त्यावर अर्थसंकल्पात कुठलाही तोडगा नाही, पण १२ लाखांचे उत्पन्न करमुक्त केल्याची घोषणा करून हे सरकार लोकप्रिय होण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपच्या विजयाने मध्यमवर्गीय खूश नाही. त्यांना खूश करण्यासाठी १२ लाखांचे उत्पन्न करमुक्त केल्याचा फंडा आणला, पण सुरीला मध लावून ती म ध्यमवर्गीयांच्या मानेवर फिरवण्याचाच हा प्रकार आहेङ्ग असे टीकास्त्र सोडत सावध राहण्याचा इशाराही या अग्रेलखातून देण्यात आला आहे.मध्यमवर्गीयांच्या घरावर जणू काही सोन्याची कौलेच चढणार आहेत सामनाच्या अग्रलेखातून बजेटवर टीकास्त्र सोडण्यात आले आहे. सामनाचा अग्रलेख जसाच्या तसाःनिर्मला सीतारामन या खडूस बाईने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर अद्यापही भक्तांचे टाळ्या वाजवणे संपलेले नाही. जणू काही साम ान्य जनता व मध्यमवर्गीयांच्या घरावर सोन्याची कौलेच चढणार आहेत अशा पद्धतीचा गाजावाजा सुरू झाला आहे. १२ लाखांपर्यंत आयकरावर सूट यावर भाजप भक्तांना आनंदाच्या उकळ्या फ ुटल्या आहेत. मुळात देशात किती लोक इन्कम टॅक्स भरतात? तर साधारण साडेतीन कोटी लोक. त्यातील दोन कोटी लोकांचे उत्पन्न सात लाखांपेक्षा कमी आहे. म्हणजे त्यांना आधीच सूट मिळाली आहे. दीड कोटीत फार तर ८०-८५ लाख हे पगारदार किंवा नोकरदार असतील. त्यातील ५० लाख लोकांचे पगार १२ लाखांच्या आसपास आहेत. मग उरले किती, तर साठेक लाख. म्हणजे नव्या कर प्रणालीचा फायदा फार




तर पन्नासेक लाख लोकांना होईल, पण ढोल असे वाजवले जात आहेत की, ४५ कोटी लोकांना फायदा होणार आहे. पुन्हा मोदी कृपेने जे सुशिक्षित बेरोजगार पकोडे तळत आहेत त्यांना याचा काहीच लाभ नाही. मग या तुता-या का फुंकल्या जात आहेत? बजेट हे काही असाधारण वगैरे नाही. सामान्य कुवतीच्या महिलेने सामान्य बुद्धिमत्तेच्या सरकारसाठी तयार केलेले राजकीय बजेट आहे, असा चिमटा अग्रलेखातून काढण्यात आला आहे. दिल्लीत विधानसभा निवडणुका आहेत. त्यांच्यासाठी मोदी-शहांनी आधीच फुकटच्या रेवड्या वाटल्या आहेत. बिहारातदेखील निवडणुका तोंडावर असल्याने पैसा आणि योजनांचा पाऊस बिहारवर पडला. नेहमीप्रमाणे हे बजेट निवडणूकप्रधान आहे. ते काही देशासाठी वगैरे नाही, अशी टीकाही अग्रलेखात करण्यात आली आहे.

## नोक-या नाहीत त्यांनी पकोडे तळावेत असा मोदींचा मंत्र

हे बजेट म्हणे मध्यमवर्गीयांसाठी आहे! सपशेल झूठ. मोदी सरकारने आधी महिलाकेंद्रित बजेट आणले होते, पण देशातील बहुसंख्य महिला आजही मोफत रेशनच्या रांगेत उभ्या आहेत व गोवा, महाराष्ट्र, झारखंड, मध्य प्रदेश अशा राज्यांत लाडक्या बहिणींफ्ना महिन्याला हजार-पंधराशेचे आमिष दाखवून त्यांना खूश केले जात असेल तर त्यास काय महिला वर्गाचा विकास म्हणायचा? मोदींनी शेतकरीन्मुख बजेट सादर करण्याचा पराक्रम केलाच होता, पण मोदी आल्यापासून शेतकरी शेतमालास किमान भाव मिळावा म्हणून उपोषण व आंदोलन करीत आहे आणि आजही पंजाब-हरयाणात शेतकरी उपोषणाला बसला आहे. मोदींनी रोजगारकेंद्रित बजेट आणले. मोदी वर्षाला दोन कोटी रोजगार देणार होते. प्रत्यक्षात मोदी राज्यात नोक-यांचा दुष्काळ पडला आहे. स्पर्धा परीक्षांचे पेपर बाजारात विकले जात आहेत. बेरोजगार राज्याराज्यांत आंदोलनासाठी रस्त्यांवर उतरला आहे व मोदींचे पोलीस बेरोजगारांवर लाठीमार करीत आहेत. नोक-या नाहीत त्यांनी पकोडे तळावेत असा मोदींचा मंत्र आहे. मोदींनी आता मध्यमवर्गास दिलासा वगैरे देणारा एक नागमोडी अर्थसंकल्प पेश केला. त्यामुळे मध्यमवर्गाने सावध राहिले पाहिजे. सुरीला मध फासून गळा कापण्यात हे लोक पटाईत आहेत, असा टोला सामनातून लगावण्यात आला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com